MHKO180001062026

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५५/२०२६
[महाराष्ट्र सरकार विरुध्द वामन रघुनाथ पुजारी (खातेदार)]

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कुरुंदवाड (श्री.बाळासाहेब श्री. गायकवाड) यांचे न्यायालयात**

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे प्रकरण १८ अन्वये आरोपीचे प्रतिकथन**

**निशाणी क्र. ०३/ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | – | १९.१२.२०२५ |
| फिर्याद किंवा अहवाल दाखल दिनांक | – | १९.१२.२०२५ |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | – | **महाराष्ट्र शासनातर्फे**<br>पोलीस निरीक्षक,<br>कुरुंदवाड पोलीस ठाणे, |
| आरोपीचे नाव व पत्ता | – | **वामन रघुनाथ पुजारी (खातेदार),**<br>वय – ६६ वर्षे, धंदा – पंडीत,<br>रा. नृसिंहवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर. |

**गुन्ह्याचा मजकूर** –

दिनांक १९.१२.२०२५ रोजी २१.३० वाजण्याचे सुमारास कुरुंदवाड, ता.शिरोळ येथील महाराणा प्रताप चौक येथील टी.पी.कोळी यांच्या देशी दारु दुकानासमोर सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही आरोपी दारु पिवून उभे असल्याचे आढळून आलात आणि त्याअन्वये तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ८४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा अपराध केला आहे.

**आरोपीचे प्रतिकथन** –

प्रश्न क्र.१ – तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हाला आता न्यायालयाने वाचून व समाजावून सांगितलेला मजकूर समजला काय?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – होय, मला गुन्हा कबुल आहे.

समक्ष,

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.25 17:57:57 +0530

-------------

आरोपीची सही/अंगठा

**( बाळासाहेब श्री. गायकवाड )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड

कुरुंदवाड.
दिनांक २५.०३.२०२६

## नि का ल प त्र

आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. त्याद्वारे त्याला त्याच्यावर लावण्यात आलेले आरोप मान्य व कबुल असल्याचे कथन केले आहे. आरोपीची आर्थीक परिस्थीती ही बेताची असून तो कुटूंबातील एकमेव कर्ता पुरुष आहे, त्यामुळे त्याला कमीत कमी दंडाची शिक्षा करण्यात यावी अशी त्याने विनंती केली. म्हणून, आरोपीच्या परिस्थितीचा आणि गुन्ह्याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## :: आ दे श ::

| | |
|---|---|
| १} | आरोपी **वामन रघुनाथ पुजारी (खातेदार)** याला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ८४ या कलमाखाली शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७५ प्रमाणे दोषी ठरविण्यात येते. |
| २} | आरोपीस महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ८४ या कलमाखाली शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता रक्कम रुपये **१,०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त)** इतक्या द्रव्यदंडाची आणि दंड न भरल्यास १० दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते. |

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.25 17:58:04 +0530

कुरुंदवाड.
दिनांक २५.०३.२०२६

**( बाळासाहेब श्री. गायकवाड )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड